‘‘लातूर जिल्हयातील उर्दू प्राथमिक शाळेतील कृतियुक्त अध्ययन अध्यापन पध्दतीच्या

अंमलबजावणीच्या परिणामकारकतेचा शोध : एक अभ्यास’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ. नांदेड शिक्षणशास्त्र पीएच. डी.

पदवीसाठी संशोधन आराखडा

संशोधिका

सय्यद आयशा अ. मलिक

एम. ए. इतिहास, एम.ए. उर्दू, एम. एड्., एम फील.

मार्गदर्शक

डॉ. गौतम रामचंद्र गायकवाड

एम. ए. एम एड्.,पीएच. डी.

महात्मा फुले अध्यापक महाविद्यालय, जळकोट

ता. जळकोट जि. लातूर.

संशोधन केंद्र.

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

जुलै - २०२२

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	पृष्ठ क्र.
०१.	प्रस्तावना	३-४
०२.	समस्या विधान	४
२.१	कार्यात्मक व्याख्या	४
२.२	संकल्पनात्मक व्याख्या	४-५
०३.	संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा	५
०४.	उद्दिष्टे	५
०५.	संशोधनाची गरज	५
०६.	संशोधन समस्येचे महत्व	५-६
०७.	समस्येची व्याप्ती	६
०८.	समस्येची मर्यादा	६-७
०९.	गृहितके	७
१०.	परिकल्पना	७
११.	संशोधन कार्यपध्द्ती	७-९
	अ. संशोधनाची पध्दती	७
	ब. संशोधनाची साधने	७
	क. जनसंख्या	८
	क. नमुना निवड	८
	ड. संख्याशास्त्रीय परिमाणे (साधने)	८
	इ. संकलित माहितीचे विश्लेषण, अर्थनिर्वचन, निष्कर्ष मांडणी.	८-९
१२.	प्रकरणीकरण	९
१३.	संशोधनाचा कालावधी	९
१४.	अंदाजित खर्च	१०
१५.	संदर्भग्रंथ सूची.	१०

०१. प्रस्तावना :

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मोठ्या प्रमाणावर प्रगती केली आहे. यात शिक्षणाची भूमिका फार महत्वाची आहे. प्राथमिक शिक्षणास बालकाची मूलभूत आवश्यकता समजण्यात येते. प्राथमिक शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे; तेही मोफत, सार्वत्रिक व सक्तीचे असले पाहिजे. भारतीय राज्यघटनेत कलम ४५ अन्वये प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, मोफत व सक्तीचे करावे असे सूचित केले आहे.

प्राथमिक शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांत विविध क्षमता, मूल्य व कौशल्य विकसित केली जातात. विद्यार्थ्यांत असणाऱ्या सृजनशिलतेला वाव दिला जातो. प्राथमिक स्तरावर मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळेत विविध अध्यापनपध्दतीद्वारे शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना कृतिशील बनविण्याचा प्रयत्न केला जातो.

ABL (Activity Based Learning) 'कृतियुक्त अध्ययन पध्दती' ही एक प्रभावी व परिणामकारक अशी अध्ययन पध्दती आहे. पारंपारिक अध्ययन पध्दतीपेक्षा ही पध्दत वेगळी असून, विद्यार्थी हा केंद्रबिंदू असतो. तो प्रत्यक्ष कृतीतून शिकतो. त्यामुळे केलेले अध्ययन हे प्रभावी व चिरकाल टिकणारे असते. या पध्दतीत शिक्षकाची भूमिका ही मार्गदर्शकाची असते.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा -२००५, शिक्षण हक्क कायदा २००९ तसेच राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० मध्ये ज्ञानरचनासाठी कृतियुक्त अध्ययनाचा वापर शिक्षणप्रक्रियेत करावा असा उल्लेख केलेला आहे. ज्ञानरचनासाठी अध्ययन पध्दतीमध्ये कृतीच्या मदतीने शिकणे हे मूळ सूत्र आहे. ही कृती काही वेळा प्रत्यक्ष साहित्य वापरून तर काही वेळा ती मानसिक स्वरुपाचीही असू शकते. विज्ञान, भूगोल हे विषय प्रयोगाच्या माध्यमातून शिकवले जातात. यात कृतीला महत्व असते. अर्थात कृती हे अध्ययनाचे प्रभावी माध्यम आहे.

ABL या पध्दतीत मुलांना स्वतः कृती करून शिकावे लागते. यामध्ये इ. १ ली ते ४ थी च्या वर्गाच्या अभ्यासक्रमाची मांडणी माईलस्टोन (milestone) मध्ये केलेली आहे. यात घटक, उपघटक, पाठ्यमुद्दे वेगवेगळ्या कृतीमध्ये विभागले आहेत. या कृती/कार्ड यांची क्रमबध्द मांडणी म्हणजे माईलस्टोन होय. माईलस्टोनची मांडणी केलेला तक्ता म्हणजे Ladder होय. अशाप्रकारे साहित्याची ओळख प्रत्येक विषयासाठी वेगवेगळे लोगो, वर्गखोल्याचे नियोजन अशी कृती घडत असते. सर्व विद्यार्थी सामुहिकरित्या सहभागी होत असतात.

लातूर शहरात मराठी माध्यमांच्या प्राथमिक शाळांबरोबरच उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळा देखील आहेत. त्या शाळांत ABL (कृतीयुक्त अध्ययन पध्दती) चा उपयोग करून विद्यार्थ्यांना कृतीशील

बनविण्याचा प्रयत्न केला जातो. उर्दू प्राथमिक शाळेतून या अध्ययन पध्दतीचा होत असलेला उपयोग व त्याची परिणामकारकता याचा शोध घेण्याचा प्रयत्न सदर संशोधनात संशोधिका करणार आहे.

०२. समस्या विधान :

उर्दू प्राथमिक शाळेतील कृतियुक्त अध्ययन अध्यापन पध्दतीच्या अंमलबजावणीच्या परिणामकारकतेचा शोध : एक अभ्यास

२.१ कार्यात्मक व्याख्या :

०१) विद्यार्थी :

"लातूर जिल्हयातील उर्दू प्राथमिक शाळेतील इ. १ ली ते ४ थी च्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यार्थी संबोधले आहे."

०२) लातूर :

"महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील एक प्रमुख जिल्ह्याचे ठिकाण ऐतिहासिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यावहारिक बाबतीत महत्व प्राप्त झालेले शहर."

२.२ संकल्पनात्मक व्याख्या :

०१) उर्दू माध्यम :

"मराठी प्राथमिक शाळांप्रमाणे एक शाळा परंतु अध्यापनाची व अध्ययनाची भाषा ही उर्दू असते."

०२) प्राथमिक शाळा :

"पूर्वप्राथमिक शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना भाषा, गणित व परिसर अभ्यास याचे शिक्षण १ ली ते ७ वी किंवा ८ वी या वर्गातून दिले जाते त्यास प्राथमिक शाळा म्हणतात."

०३) अध्ययन :

"अनुभूतीद्वारे व्यक्तीच्या वर्तनात हळू-हळू घडून येणारा बदल म्हणजे अध्ययन होय."

- गिलफोर्ड

०४) अध्यापन :

"अध्ययनाचे संपादन करण्याच्या उद्देशाने केलेली कृती असे अध्यापनाचे वैशिष्टये सांगता येईल. या कृतीचा सराव किंवा वापर असा केला जातो की, ज्यामध्ये विद्यार्थ्यांची बौध्दिक कृती व स्वतंत्र निर्णयक्षमता याचा आदर केला जातो."

- शेफलर

०५) कृतियुक्त अध्ययन पध्दती : (ABL)

"ही एक प्रभावी व परिणामकारक अशी अध्ययन पध्दती असून, पारंपारिक अध्ययन पध्दतीपेक्षा वेगळी आहे. त्यात विद्यार्थी हा केंद्रबिंदू असतो. तो प्रत्यक्ष कृतीतून शिकतो. त्यामुळे केलेले अध्ययन हे प्रभावी व चिरकाल टिकणारे असते. या पध्दतीत शिक्षकाची भूमिका ही मार्गदर्शकाची असते."

०३. संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा :

कोणत्याही विषयावर संशोधन करत असताना त्या विषयाशी संबंधित संशोधनाचा व साहित्याचा आढावा घेणे आवश्यक ठरते. कारण त्याचा उपयोग संशोधकाला आपल्या संशोधनासाठी करता येतो. संशोधिका संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा घेणार आहे.

०४. उद्दिष्टे :

१. उर्दू प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना कृतियुक्त अध्ययन पध्दती आत्मसात करतांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

२. कृतियुक्त अध्ययन पध्दतीची अंमलबजावणी करतांना शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

३. प्रमाणित चाचणीच्या सहाय्याने अध्ययनाची परिणामकता तपासणे.

४. कृतियुक्त अध्ययन पध्दतीमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

५. कृतियुक्त अध्ययन पध्दतीच्या अंमलबजावणीत येणाऱ्या समस्येवर उपाय योजना करणे.

०५. संशोधनाची गरजः

काळ झपाट्याने बदलत आहे. शिक्षण पध्दतीत देखील अमुलाग्र बदल होत आहेत. विद्यार्थ्यांना फक्त पोपटपंची न बनवता त्यांच्यात मुलभूत क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत आहेत. विद्यार्थी कसा कृतिशील बनेल याचा विचार प्रामुख्याने होत आहे. शिक्षक केंद्रीत अध्यापन पध्दती ऐवजी विद्यार्थी केंद्रित अध्ययन पध्दतीला महत्व देण्यात येऊ लागले आहे.

विद्यार्थी स्वतःच्या गतीने शिकणे. ABL सारख्या अध्ययनपध्दतीद्वारे दृढीकरणास मदत होते. तो सतत कार्यमग्न कसा राहिल, हसत खेळत मनोरंजनातून तो शिक्षण कसे घेईल? त्याचा सर्वांगीण विकास कसा होईल? ही गरज लक्षात घेऊन संशोधिकेने सदर संशोधन हाती घेतले आहे.

०६. संशोधनाचे महत्वः

शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारचे कुतुहल असते. विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लावण्यासाठी विविध अध्यापन पध्दती व तंत्रे याचा उपयोग केला जातो. याऐवजी जर कृतीयुक्त अध्ययन

अध्यापन पध्दती (ABL) उपयोगात आणली तर ती अधिक प्रभावी ठरेल. हे महत्व लक्षात घेऊन संशोधिकेने सदर संशोधन कार्य हाती घेतले आहे.

कृतीयुक्त अध्ययन पध्दतीमुळे

१. विद्यार्थी स्वतःच्या गतीने व क्षमतेने शिकतो.

२. विद्यार्थी दिवसभरात दोन विषयाचे नियोजन करतो.

३. प्रत्यक्ष कृती करून शिकत असल्याने अध्ययन प्रभावी व परिणामकारक होते.

४. वरील अध्यापन पध्दतीत सराव दृढीकरणाला भरपूर वाव असतो.

५. विद्यार्थ्याने अध्ययन केलेल्या घटकावरच (चाचणी) असते. त्यामुळे परीक्षेचा ताण नसतो.

६. हसत, खेळत मनोरंजनातून शिक्षण होते.

७. विद्यार्थी सतत कार्यमग्न असतो.

८. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते.

९. सहकार्याची भावना वाढीस लागते.

१०. विद्यार्थी एका वर्षात एकापेक्षा जास्त इयत्तांचा अभ्यास करू शकले.

अशा प्रकारे कृतियुक्त अध्ययन पध्दतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कृतिशिलतेला वाव मिळून अध्ययनात गोडी निर्माण होते. तो हसत खेळत मनोरंजनातून शिक्षण घेतो आणि त्याच्या सर्वांगिण विकासास मदत होते.

०७. समस्येची व्याप्ती :

१. स्थळ व्याप्ती :

अ. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही लातूर जिल्हयाशी संबंधित आहे.

ब. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही लातूर जिल्हयातील उर्दू प्राथमिक शाळेशीच संबंधित आहे.

२. आशय व्याप्ती :

अ. सदरील संशोधनाची आशय व्याप्ती विद्यार्थ्यांच्या कृतियुक्त अध्ययन अध्यापनाशी व शैक्षणिक प्रगतीशी संबंधित आहे.

ब. प्रस्तुत संशोधनाची आशय व्याप्ती अध्यापन कार्याशी संबंधित आहे.

०८. समस्येच्या मर्यादा :

१. स्थळ मर्यादा :

अ. प्रस्तुत संशोधन हे लातूर जिल्हयापूरते मर्यादित आहे.

ब. प्रस्तुत संशोधन हे लातूर जिल्हयातील उर्दू शाळेपूरतेच मर्यादित आहे.

२. आशय मर्यादा :

अ. सदरील संशोधन हे कृतियुक्त व पारंपरिक अध्ययन अध्यापन पध्दतीपूरतेच मर्यादित आहे.

ब. प्रस्तुत संशोधन हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाशी संबंधित आहे.

३. कालावधी मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे २०२१-२०२३ या कालावधीपूरते मर्यादित आहे.

०९. गृहितके :

१. उर्दू प्राथमिक शाळेत पारंपारिक पध्दतीने अध्यापन जाते.

२. उर्दू प्राथमिक शाळेत कृतियुक्त अध्ययन पध्दतीचा वापर केला जातो.

३. उर्दू प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना कृतियुक्त अध्ययन अध्यापन पध्दती आवडते.

१०. परिकल्पना :

१. उर्दू प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पारंपारिक पध्दतीने व कृतियुक्त अध्ययन पध्दतीने अध्यापन केल्याने संपादणुकीत सार्थ फरक आढळत नाही.

११. संशोधनाची कार्यपध्दती :

अ) संशोधनाची पध्दती :

संशोधनाची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी संशोधिकेला आपल्या समस्येविषयी माहिती संकलित करावी लागते. ती माहिती संकलित करण्यासाठी विविध साधनांचा व पध्दतींचा वापर करावा लागतो. त्यातून निष्कर्ष काढले जातात.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिका सर्वेक्षण व प्रायोगिक संशोधन पध्दतींचा अवलंब करणार आहे.

ब) संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधनात संशोधिका उर्दू प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी ‘चाचणी’ या साधनाचा वापर करणार आहे. प्रस्तुत चाचणी शाळेतील शिक्षकांकडून प्रमाणित करुन घेतली जाईल. ही चाचणी पूर्व चाचणी व उत्तर चाचणी घेण्याच्या प्रक्रियेत ०२ महिन्याचा कालखंड घेतला जाईल.

क) जनसंख्या (Population)

"संशोधिकेने नमुना ज्यातून निवडला आहे. असा संपूर्ण भाग म्हणजे जनसंख्या होय."

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने लातूर जिल्हयातील उर्दू प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचाच अभ्यास करणार आहे. जनसंख्या म्हणून एकूण ५० शाळा घेतल्या आहेत.

ड) नमुना निवड : (Sample)

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलित करण्यासाठी संशोधन समस्येशी संबंधित सर्व घटकांना सामावून घेणे अशक्य असले तरी बऱ्याचवेळा ते अत्यंत त्रासदायक ठरते. त्यामुळे प्रतिसादकांतून प्रातिनिधिक स्वरूपात आवश्यक प्रतिसादकाची निवड करावी लागते. प्रस्तुत संशोधनात लातूर जिल्हयाचा विचार करण्यात येणार आहे.

सदर संशोधनासाठी संशोधिकेने संभाव्य नमुना निवड पध्दतीव्दारे लातूर जिल्हयातील ४८ उर्दू प्राथमिक शाळा व असंभाव्यता नमुना निवड पध्दतीनुसार सहेतुक पध्दतीने ०२ शाळा निवडल्या जाणार आहेत. प्रायोगिक पध्दतीने संशोधन करण्यासाठी लातूर जिल्हयातील ॲड. हाजी नईमोद्दीन उर्दू प्राथमिक शाळा, लातूर व औसा शहरातील अजीम उर्दू प्राथमिक शाळा यांची निवड करण्यात येणार आहे.

इ) संशोधनाची सांख्यिकीय परिमाणे :

सदर संशोधनासाठी संशोधिका माहिती संकलनासाठी केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे (मध्यमान, मध्यगा, बहुलक, विचलन शिलता इ.) उपयोगात आणली जाणार आहेत.

ई) संकलित माहितीचे विश्लेषण, अर्थनिर्वचन व निष्कर्ष मांडणी :

सदर संशोधनासाठी संशोधिका चाचणी या साधनाचा उपयोग करणार आहे. कारण ते एक माहितीचे स्त्रोत आहे.

प्रस्तुत प्रकरणात पूर्वनिश्चित केलेली उद्दिष्टे व परिकल्पना यानुसार उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावला जाणार आहे. व परिणाम जाणून घेतला जाणार आहे.

प्रस्तुत संशोधन आराखड्याआधारे संशोधनाची गरज व महत्व विचारात घेवून गृहितके व परिकल्पना पडताळणी करण्यासाठी संख्यात्मक व गुणात्मक माहितीच्या अर्थनिर्वचनासाठी मध्यमान, प्रमाण-विचलन, सहसंबंध गुणक, दोन चलातील फरक पाहण्यासाठी (T-test) ही संख्याशास्त्रीय परिमाणे वापरली जाणार आहेत. प्रस्तुत परिमाणाच्या सहाय्याने संकलित झालेल्या माहितीचे वर्गीकरण, कोष्टकीकरण आणि आलेखात्मक पध्दतीने मांडणी करण्यात येईल.

तसेच विश्लेषण व अर्थनिर्वचन करुन गृहितकाची पडताळणी केली जाईल व ठळक निष्कर्ष काढण्यात येतील. पुढील संशोधनासाठीचे विषय, शिफारशी व उपाययोजना सूचविण्यात येतील.

१२. प्रकरणीकरण :

१. प्रकरण पहिले : प्रस्तावना

२. प्रकरण दूसरे : संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा

३. प्रकरण तिसरे : संशोधन पध्दती

४. प्रकरण चौथे : संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

५. प्रकरण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी

१३. संशोधनाचा कालावधी

अ.क्र.	संशोधनासाठी लागणारा कालावधी	महिने	संशोधन कार्य
०१	जुलै – २०२२	-	नोंदणी
०२	जुलै २०२२ ते डिसेंबर २०२२	६	संशोधनाचा प्रास्ताविक अभ्यास
०३	डिसेंबर २०२२ ते जून २०२३	६	संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा
०४	जून २०२३ ते डिसेंबर २०२३	६	प्रश्नावली तयार करणे. (प्रमाणित करणे) तयार मागविणे.
०५	डिसेंबर २०२३ ते जून २०२४	६	माहिती संकलित करणे.
०६	जून २०२४ ते डिसेंबर २०२४	६	माहितीचे अर्थनिर्वचन करणे, निष्कर्ष, शिफारशी सूचविणे.
०७	डिसेंबर २०२४ ते जून २०२५	६	अहवाल लेखन करणे.

१४. अंदाजित खर्च :

अ.क्र.	तपशील	खर्च
०१	आराखडा कच्चे काम	७००/-
०२	प्रवास खर्च	१०००/-
०३	संशोधन साहित्य	३००/-
०४	संदर्भ साहित्य : पुस्तक खरेदी	२०००/-
०५	संगणकीकृत करणे	५००/-
०६	स्टेशनरी साहित्य	२००/-
०७	इतर	३००/-
	एकूण	**५०००/-**

१५. संदर्भग्रंथ सूची :

१. मुळे रा. शं., वि.तु. उमाठे : शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे दुसरी आवृत्ती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर १६८७

२. भिंताड डॉ. वि.रा. : शैक्षणिक संशोधन पध्दती, नूतन प्रकाशन पुणे, पुनमुद्रण, -मे २००५

३. पंडित बन्सी बिहारी : शिक्षणातील संशोधन, आवृत्ती पहिली नूतर्तन प्रकाशन पुणे, १९९७

४. डॉ. कुंडत्वे म.बा. : शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र दहावी आवृत्ती श्री. विद्या प्रकाश, नागपूर २००३ एम.एस. एसिमोव., क्लिफर्ड एडमंड बॉसवर्थ (१९९९)

द एज ऑफ अचिव्हमेंटः खंड मोतीलाल बनारसीदास आयएसबीएन ८१-२०८-१५९६-३.

संशोधिका
सय्यद आयशा अ. मलिक
एम. ए. इतिहास, एम.ए. उर्दू, एम. एड्., एम फील

मार्गदर्शक
डॉ. गौतम रामचंद्र गायकवाड
एम. ए. एम एड्.,पीएच. डी.
महात्मा फुले अध्यापक महाविद्यालय,
जळकोट ता. जळकोट जि. लातूर.